द महाराष्ट्र
स्टेट केमिस्टस् ॲन्ड
ड्रगिस्टस् असोशिएशन
THE MAHARASHTRA
STATE CHEMISTS &
DRUGGISTS ASSOCIATION

SERVICE & SECURITY TO PATRONS
MSCDA

OFFICE : 301, Safalya Bldg., 3rd Floor,
Opp. Jaigopal Industrial Estate,
Baburao Parulekar Marg,
Dadar (W.R.), Mumbai - 400 028.
Phone : 2431 0043, 2431 0017
Fax : 022 - 2431 0114
e-mail : info@mscda.in
Affiliated to : (AIOCD)
All India Organisation of Chemists & Drugists.

२७ जानेवारी २०२२

संदर्भः एमएसपीसी/एमएससीडीए/२०५/२०२२

**मुख्य कार्यकारिणी पदाधिकारी**
**सर्व झोनल अध्यक्ष / सचिव, सर्व जिल्हा अध्यक्ष / सचिव**
**महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲन्ड ड्रगिस्ट असोसिएशन**

**विषय : महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेच्या निवडणुकीच्या नियोजनाबाबत**

महोदय,

आपणास माहितच आहे की, महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सीलच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरु झालेली असुन या निवडणुकीत एमएससीडिएच्यावतीने सहा उमेदवारांचे पॅनेल उभे करण्यात येणार आहेत. आपणास सहा ही उमेदवारांना निवडून कौन्सील मध्ये पाठवायचे आहे.

त्याअनुषंगाने **आपणास खालील बाबी लक्ष देऊन करावयाच्या आहेत.**

१. जिल्ह्याकडे प्राप्त झालेल्या मतदार यादीची तालुका निहाय विभागणीबाबत तपासणी करुन घेणे.

२. प्रत्येक तालुक्यात त्या त्या तालुक्याची मतदार यादी २ प्रतीत पाठविणे.

३. जिल्हा, शहर व तालुका निहाय कमिटीची स्थापना करणे.

४. केमिस्ट व्यतिरिक्त इतर क्षेत्रातील फार्मासिस्टशी संपर्क साधून त्यांची स्वतंत्र यादी तयार करणे.

५. अशा मतदारांशी संपर्क साधून आपल्या पॅनलला मतदान करवून घेण्याची जबाबदारी तालुक्यातील केमिस्ट बांधवामध्ये आपआपसात वाटून देणे.

६. प्रत्येक तालुक्याकडून त्यांच्या तालुक्यातील किती फार्मासिस्ट बांधवांशी संपर्क होऊ शकतो व किती फार्मासिस्टची ओळख पटू शकली नाही त्याची स्वतंत्र यादी तयार करुन त्वरित राज्य संघटनेच्या कार्यालयाकडे पाठविणे.

७. झोन पदाधिकाऱ्यांनी जिल्ह्यांशी नियमित संपर्कात राहुन त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेणे, त्यांना आवश्यक ते सहकार्य करणे, आपल्या झोनमधील सर्व जिल्ह्यांच्या केलेल्या कार्याचा अहवाल नियमितपणे राज्यसंघटनेकडे पाठविणे.

८. आपल्या जिल्ह्यातील वैद्यकीय प्रतिनिधी (Medical Representative) यांच्या संघटनांशी व त्यातील नोंदणीकृत फार्मासीस्ट असणाऱ्या प्रत्येकाशी वैयक्तिक संपर्क साधावा व आपल्या पॅनलविषयी व्यवस्थित माहिती द्यावी.

९. वैद्यकीय प्रतिनिधी तसेस शैक्षणिक क्षेत्रात व हॉस्पिटल फार्मसी व उत्पादन क्षेत्रात व या व्यतिरिक्त माहिती असलेल्या नोंदणीकृत फार्मासीस्ट यांच्याशी संपर्कात राहून त्यांना निवडणुकीविषयी व आपल्या पॅनल विषयी व्यवस्थित माहिती द्यावी.

१०. महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेच्या निवडणुकीसंदर्भात **सोशल मिडियावर** कोणतीही पोस्ट राज्य संघटनेला पुर्व सुचना देऊन व मान्यता घेतल्याशिवाय टाकण्यात येऊ नये याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

द महाराष्ट्र
स्टेट केमिस्टस् ॲन्ड
ड्रगिस्टस् असोशिएशन
THE MAHARASHTRA
STATE CHEMISTS &
DRUGGISTS ASSOCIATION

SERVICE & SECURITY TO PATRONS
MSCDA

OFFICE : 301, Safalya Bldg., 3rd Floor,
Opp. Jaigopal Industrial Estate,
Baburao Parulekar Marg,
Dadar (W.R.), Mumbai - 400 028.
Phone : 2431 0043, 2431 0017
Fax : 022 - 2431 0114
e-mail : info@mscda.in
Affiliated to : AIOCD
All India Organisation of Chemists & Drugists.

११. खालील दिलेल्या तक्त्याप्रमाणे आपल्या जिल्ह्यातील (आपणास दिलेल्या यादीतील) नोंदणीकृत

| अ.क्र. | जिल्ह्यातील एकुण नोंदणीकृत फार्मासिस्ट | औषध विक्रेते | वैद्यकीय प्रतिनिधी | शासकीय/खाजगी रुग्णालयात काम करणारे | शैक्षणिक क्षेत्रात सेवेत काम करणारे | उत्पादन सेवेत काम करणारे | अन्य |
|---|---|---|---|---|---|---|---|
| तालुक्याचे नाव | | | | | | | |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |

१२. मतदारयादी आपल्या शहर अथवा तालुक्यातील नोंदणीकृत फार्मासिस्टचे नाव यादीत आढळत नसल्यास त्याची नोंद घ्यावी व त्याचे नाव अन्य जिल्ह्यातील यादीत असल्याची शक्यता असल्यास संबंधीत जिल्ह्याशी अथवा झोनचे पदाधिकारी यांच्याशी संपर्क करावा.

झोनचे सर्व पदाधिकारी व मुख्यतः प्रत्येक झोनचे अध्यक्ष , सचिव व संघटन सचिव हे त्या त्या झोनसाठी निवडणुकी संबधित कामकाज सांभाळण्याच्या दृष्टिने त्या त्या झोनचे प्रमुख म्हणून कामकाज पाहतील.

वरील प्रमाणे कार्याच्या दृष्टिने त्वरित तयारीला लागावे. वरील बाबतीत आमच्याकडून कुठल्याही सहकार्याची अपेक्षा अथवा गरज असल्यास राज्य संघटनेचे सचिव - श्री. अनिल नावंदर यांच्याशी संपर्क साधावा.

कळावे.

आपले नम्र
**दि महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशन**

अनिल नावंदर
सचिव